महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक २१६१(२)६५४६/PH/दहा दि. ०५ सप्टेंबर, २०१९

# घोषणा

**सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई गट-अ – जाहिरात क्रमांक ०३/२०१६**
**औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई गट-ब – जाहिरात क्रमांक ०८/२०१६**
या दोन्ही पदाच्या शैक्षणिक अर्हता व अनुभव प्रमाणपत्राबाबत

सहायक आयुक्त (औषधे) जाहिरात क्रमांक ०३/२०१६ (दिव्यांग अनुशेष) व औषध निरीक्षक जाहिरात क्रमांक ०८/२०१६ (दिव्यांग अनुशेष) या दोन्ही पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांकडून शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या दाव्यासंदर्भातील प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्व-साक्षरीत प्रती छाननीकरीता आयोगाच्या दि. २१ मे, २०१९ रोजीच्या पत्रानुसार पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर पत्रे अर्ज केलेल्या सर्व संबंधित उमेदवारांच्या Profile मध्ये पाठविण्यात आली होती. तसेच त्यांना त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर SMS दवारे सुचनाही केल्या होत्या. असे असुनही काही उमेदवारांनी अदयापही आयोगाकडे कागदपत्रे पाठविलेली नाहीत. तरी ज्या उमेदवारांनी अदयापही कागदपत्रे पाठविलेली नाहीत त्यांनी दि.१३ सप्टेंबर, २०१९ पर्यंत शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या दाव्यासंदर्भातील प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्व-साक्षरीत प्रती Hard Copies च्या स्वरुपात आयोगाच्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावीत. सदर कागदपत्रांच्या लिफाप्यावर पदाचे नाव व जाहिरात क्रमांक स्पष्ट नमूद करावा. तसेच सदर कागदपत्रांच्या Soft Copies desk10.mpsc@maharashtra.gov.in या E-mail ID वरही पाठविण्यात याव्यात. प्रमाणपत्रांच्या प्रतीसोबत आपण अनुभवाचा दावा केलेल्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ. ची प्रत पाठवावी. आयोगाच्या संकेतस्थळावरील सरळसेवा भरती अंतर्गत उमेदवारांच्या सर्वसाधारण सुचनांमधील परिशिष्ट १४ च्या नमुन्यात अनुभवाची प्रमाणपत्रे आयोगाकडे सादर करावीत. प्रमाणपत्रांच्या प्रती दि.१३ सप्टेंबर, २०१९ या दिनांकापर्यंत प्राप्त न झाल्यास सदर पदांसाठी संबंधित उमेदवारास स्वारस्य नसल्याचे समजुन त्यांचा प्रस्तुत पदाच्या भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

उप सचिव (सरळसेवा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग